YUVAGIRI
Rotary Club of Pune Yuva
Issue no 4
October 2023
Rotary District 3131
Club No. 88417

**Rtn. Ninad Jog**
President

**Rtn. Archhiita Maadkke**
Secretary

**Rtn. Nitin Patasker**
President

## President Rtn. Ninad Jog - BOL
## Empowering communities through impactful social projects

I am genuinely excited about the positive impact we can make through these projects, and I encourage each one of you to bring your unique skills and passion to the table. Our collective efforts will not only transform the lives of those we serve but also strengthen the bonds within our club.
Stay tuned for more details on how you can actively participate and contribute to the success of these initiatives. Let us make this year a testament to the power of Rotary in action.
Thank you for your unwavering commitment to service, and I look forward to achieving great things together.

# October 2023 Projects

### Flag exchange with Rotary Club of Kolhapur





# YUVAGIRI

## Rotary Club of Pune Yuva

# October 2023 Projects

## Success Mantra







## PI – News Green Society



### रोटरी क्लबतर्फे 'ग्रीन सोसायटी' प्रकल्पाच्या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

रोटरी इंटरनॅशनलच्या वतीने पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी प्रकल्प राबवण्यास कायमच प्रथम प्राधान्य दिले आहे. या अनुषंगाने रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ तर्फे ग्रीन सोसायटी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

या प्रकल्पांतर्गत गृहनिर्माण संस्थांमध्ये पर्यावरणपूरक जीवनशैलीविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'ग्रीन सोसायटी' प्रकल्पाच्या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे पार पडलेल्या या कार्यशाळेच्या व्यासपीठावर रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१च्या प्रांतपाल **रो. मंजू फडके**, ग्रीन सोसायटी प्रकल्पाचे संचालक **रो. केशव ताम्हनकर** व सह-संचालक **रो. संतोष जोशी**, पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघाचे अध्यक्ष **श्री. सुहास पटवर्धन**, बँक ऑफ बडोदा आणि आयजीबीसी पुणे चॅप्टरचे चेअरमन **श्री. जे. पी. श्रॉफ** आदी मान्यवर उपस्थित होते. प्रथेप्रमाणे राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पारंपरिक पद्धतीने दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्याऐवजी यावेळी कुंडीतल्या रोपाला मान्यवरांच्या हस्ते झारीने पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

सर्व मान्यवरांना एकेक छानसे रोप देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यानंतर प्रकल्पाचे संचालक **रो. केशव ताम्हनकर** यांनी आपल्या प्रास्ताविकात ग्रीन सोसायटी प्रकल्पाबद्दल माहिती दिली. प्रकल्पाचा उद्देश, प्रकल्पाची कार्यपद्धती, प्रकल्पाचे भागीदार आणि प्रायोजक यांच्याबद्दल माहिती देताना **रो. केशव** म्हणाले, रोटरीने २०२० सालापासून पर्यावरणविषयक काम करण्यास सुरुवात केली आहे. ग्रीन सोसायटी म्हणजे केवळ ग्रीन बिल्डिंग उभारणे नसून पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करत वाटचाल करणे महत्त्वाचे आहे. आगामी ८ महिन्यात सोसायटीमध्ये होणाऱ्या पर्यावरणपूरक कामांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. त्यामध्ये रोटरीच्या झोननुसार निवड केली जाणार असून या सर्व प्रकल्पात सोसायटी मधील रहिवाशांना पर्यावरण क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१च्या प्रांतपाल **रो. मंजू फडके** आपल्या मनोगतात म्हणाल्या, "शहरी लोकांना रोटरी म्हणजे केवळ खाणे पिणे यात वेळ घालवणारा क्लब असे वाटत असते; परंतु रोटरीने ग्रामीण भागात किती कार्य केले आहे ते माहित नसते. रोटरीचे काम ग्रामीण भागात जास्त आहे, मात्र आता शहरी भागात पर्यावरणविषयक कार्य करण्याची गरज निर्माण झाली आहे. पुण्यात आम्ही दरोज दहा लाख लीटर पाणी वाचवण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. तसेच आता ग्रीन सोसायटी प्रकल्पाच्या माध्यमातून पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पनवेल या शहरांमध्ये कार्य करण्यात येणार आहे."

यानंतर पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघाचे अध्यक्ष **श्री. सुहास पटवर्धन** आपल्या मनोगतात म्हणाले की, रोटरीच्या ग्रीन सोसायटी प्रकल्पात शहरातील अधिकाधिक सोसायट्या आणि अपार्टमेंट सहभागी होतील अशी मला खात्री वाटते.

रोटरीचा हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण असून यामध्ये आपण सक्रिय सहभागी होऊ असे सांगत **जे. पी. श्रॉफ** यांनी ग्रीन सोसायटी प्रकल्पाचे कौतुक केले.

नंतर मान्यवरांच्या हस्ते 'ग्रीन सोसायटी' प्रकल्पाच्या मासिक वार्तापत्राचे प्रकाशन करण्यात आले.

इकॉलॉजिकल सोसायटीचे श्री. अजय फाटक, IGBC च्या **डॉ. पूर्वा केसकर** आणि प्लंबींग असोसिएशनचे **श्री. राहुल धडफळे** यांच्या टीमने यावेळी उपस्थितांना कचरा व्यवस्थापन, सौरऊर्जा, ग्रीन कव्हर, रेन वॉटर हार्वेस्टिंग याविषयी मार्गदर्शन केले. तर **डॉ. पूर्वा केसकर** यांनी स्पर्धेबद्दलची संपूर्ण माहिती दिली.

याप्रसंगी ग्रीन सोसायटी प्रकल्पात सहभागी झालेल्या रोटरी क्लबचे प्रेसीडेंट्स **गिरीश ब्राह्मे, गिरीश मठकर, मनीषा पुराणिक, प्रतिभा जगदाळे, सारंग वालांखे, मनोज आगरवाल, निनाद जोग** यांना सन्मानित करण्यात आले. तसेच यावेळी ग्रीन सोसायटी प्रकल्पाला सहकार्य करणाऱ्या विविध संस्थांच्या प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन **रो. प्रतिभा जगदाळे, रो. सारंग वालांखे** आणि **ॲन जयश्री धुपकर** यांनी केले, तर **रो. गिरीश मठकर** यांनी आभार मानले.

या मेळाव्यात ७० गृहनिर्माण संस्था व १४ ग्रीन सप्लायर्सनी भाग घेतला. या प्रोजेक्टसाठी **विलास जावडेकर** डेव्हलपर्स जेवी एंटरप्राइजेस यांचे प्रायोजकत्व मिळाले. जिल्हा सहकारी गृह महासंघ हे सहयोगी आहेत. ग्रीन सोसायटी प्रकल्पात सहभागासाठी **श्री. केशव ताम्हणकर - ९८२२०५२६९४**